# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः16.08.2024** **वारःशुक्रवार**

---

1. ISRO च्या लघु उपग्रह प्रक्षेपण वाहन एस एस एल व्ही वरुन पृथ्वी निरीक्षण उपग्रह EOS-08 चं थोड्याच वेळात प्रक्षेपण
2. कोलकाता महिला अत्याचार प्रकरणाच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशनचा उद्या एक दिवसाच्या देशव्यापी संपाची घोषणा
3. उद्यापासून सुरु होणाऱ्या तिसऱ्या व्हॉईस ऑफ ग्लोबल साउथ शिखर संमेलनाचं यजमानपद भारताकडे आणि
4. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथी निमित्त राष्ट्रपती आणि पंतप्रधानांकडून आदरांजली

**ISRO**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था ISRO आज सकाळी आपल्या लघु उपग्रह प्रक्षेपण वाहन एस एस एल व्ही वरुन पृथ्वी निरीक्षण उपग्रह EOS-8 चं प्रक्षेपण करणार आहे. यामुळे या लघु उपग्रह प्रक्षेपण वाहनाच्या विकास योजनेचं कार्य पूर्ण होणार असून ते लघु उपग्रहांच्या प्रक्षेपणात सेवा देण्यासाठी सक्षम होणार आहे. श्रीहरिकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून सकाळी 9 वाजून 17 मिनिटांनी हे प्रक्षेपण सुरू होईल. या प्रक्षेपणासाठी साडेसहा तासांची उलट गणती आज पहाटे 2 वाजून 47 मिनिटांपासून सुरू झाली. पी एस एल व्ही च्या तुलनेत 10 मीटर छोट्या असलेल्या एस एस एल व्ही चा उपयोग खालच्या स्तरावरील छोटे आणि कमी वजनाचे उपग्रह प्रक्षेपित करण्यासाठी होणार आहे.

**आयएमए**

कोलकाता इथं प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवरील लैंगिक अत्याचार आणि हत्येच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशनं उद्या एक दिवसाचा देशव्यापी संप जाहीर केला आहे. या काळात अत्यावश्यक सेवा सुरू राहणार असून बाह्य रुग्ण विभागाचं कामकाज मात्र बंद ठेवण्यात येणार आहे. या दुर्घटनेनंतर कोलकाता रुग्णालयात झालेल्या तोडफोडीचाही इंडियन मेडिकल असोसिएशनं निषेध केला आहे. दरम्यान, या दुर्घटनेच्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टीच्या महिला विभागाच्या वतीनं आज कोलकत्यात मूक मेणबत्ती मोर्चा काढण्यात येणार आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष वानाती श्रीनिवासन यांच्या नेतृत्वात संध्याकाळी 6 वाजता वैद्यकीय महाविद्यालयाच्या बाहेर हा मोर्चा काढण्यात येणार आहे. भाजपचे राज्यसभा सदस्य दर्शन सिंह, संगीता यादव, गीता शाक्य, इंदू बाला गोस्वामी आणि पश्चिम बंगालच्या प्रभारी पूजा कपिल मिश्रा या राष्ट्रीय पदाधिकारी या मोर्चात सहभागी होणार आहेत. भाजपच्या राज्य विभागानंही, बंगालमधील सर्व राज्य सरकारी आस्थापनांमध्ये आज दोन तास काम बंद ठेवण्याचं तसंच दुपारी 2 वाजल्यापासून सर्व जिल्ह्यात रास्ता रोकोचंही आवाहन केलं आहे.

**मोदी**

चाळीस कोटी भारतीयांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलं; आता 140 कोटी भारतीय समृध्द आणि विकसित भारत घडवू शकतात, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. स्वातंत्र्य दिनानिमित्त दिल्लीतल्या लाल किल्ल्यावर राष्ट्रध्वज फडकावल्यानंतर त्यांनी काल देशाला संबोधित केलं. पंतप्रधान मोदी यांनी सलग अकराव्यांदा लाल किल्ल्यावरून स्वातंत्र्यदिनानिमित्त भाषण केलं. सर्व स्तरातील नागरिकांच्या कल्याणासाठी सरकार काम करत आहे; कुठलाही राजकीय फायदा न बघता राष्ट्र प्रथम ही भावना समोर ठेऊन सरकार काम करत असल्याचं पंतप्रधान म्हणाले. एक देश, एक निवडणूक संकल्पना राबवण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यायला हवा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. देशात धर्मनिरपेक्ष नागरी कायद्याची गरज असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. कोलकाता इथं झालेल्या महिला अत्याचाराच्या घटनेबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली.

महिलांविरोधातील गुन्ह्यांचा लवकरात लवकर तपास होणं आवश्यक आहे; अमानुष कृत्य करणाऱ्यांना लवकरात लवकर कठोर शिक्षा होते हा विश्वास निर्माण व्हायला हवा असं त्यांनी नमूद केलं.

**राज्य स्वातंत्र्यदिन**

महाराष्ट्रातही सर्वत्र स्वातंत्र्यदिन काल उत्साहात साजरा झाला. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी पुण्यातल्या विधान भवनात राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. मुंबईत विधानभवनात विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. तर मंत्रालयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये विभागीय आयुक्त कार्यालयात ध्वजवंदन केलं. सामान्य माणसाच्या जीवनात परिर्वतन व्हावं यासाठी शासन प्रयत्नांची पराकाष्ठा करत असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं.

**राष्ट्रपती स्वागत समारंभ**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 78व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त काल संध्याकाळी राष्ट्रपती भवनात स्नेहभोजनाचं आयोजन केलं होतं. यावेळी उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, माजी राष्ट्रपती राम नाथ कोविंद, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड उपस्थित होते. याशिवाय, कार्यक्रमाला राजनाथ सिंह, जेपी नड्डा, डॉ. एस जयशंकर, अश्विनी वैष्णव, पियुष गोयल आणि शिवराज सिंह चौहान यांच्यासह केंद्रीय मंत्री आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**MEA-ग्लोबल साउथ**

भारत उद्यापासून सुरू होणाऱ्या तिसऱ्या व्हॉईस ऑफ ग्लोबल साउथ शिखर संमेलनाचं यजमानपद भूषावणार आहे. शाश्वत भविष्यासाठी सक्षम ग्लोबल साऊथ अशी या संमेलनाची संकल्पना आहे. देशा-देशातला परस्पर संघर्ष, अन्न आणि ऊर्जा सुरक्षा संकट, हवामान बदल यासारख्या जटिल आव्हानांवर मागील शिखर परिषदेत झालेल्या चर्चेचा विस्तार करण्यासाठी हे संमेलन एक व्यासपीठ म्हणून काम करेल असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे. शिखर परिषदेत, ग्लोबल साउथमधील सहभागी देशातील विकासाच्या क्षेत्रात आव्हाने, प्राधान्यक्रम आणि उपाय यावरही चर्चा होणार आहे. मागील दोन शिखर बैठकांप्रमाणेच, ही तिसरी शिखर परिषदही दूरस्थ स्वरूपात होणार आहे. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास और सबका प्रयास' या पंतप्रधानांच्या संकल्पनेचा विस्तार असलेला हा अभिनव उपक्रम सुरू वसुधैव कुटुंबकम या भारताच्या तत्त्वज्ञानावर आधारित आहे.

**उपराष्ट्रपती**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आजपासून तेलंगण आणि आंध्र प्रदेशच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. दौऱ्याच्या आजच्या पहिल्या दिवशी धनखड हैदराबाद, मधल्या कान्हा शांती वनमला भेट देतील. उद्या ते अक्षरा विद्यालय परिसर आणि कौशल्य विकास केंद्र, स्वर्ण भारत ट्रस्ट आणि आंध्र प्रदेशातील नेल्लोर इथल्या मुप्पावरपू फाउंडेशनला भेट देतील. त्यानंतर, ते आंध्र प्रदेशातील वेंकटचलम, स्वर्ण भारत ट्रस्टच्या 23 व्या वर्धापन दिनाच्या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून अध्यक्षस्थानी असतील.

**जयशंकर-कुवैत**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर येत्या 18 ऑगस्टला कुवेतच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या भेटीदरम्यान कुवेतचे परराष्ट्र मंत्री अब्दुल्ला अली अल-याह्या यांची ते भेट घेतील. या भेटी दरम्यान दोन्ही देशांमधील राजकीय, व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, सुरक्षा, सांस्कृतिक संबंध यासह विविध बाबींचा आढावा घेतला जाईल. तसंच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवरही यावेळी विचार विनिमय करण्यात येईल.

**कृषिमंत्री**

केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल नवी दिल्लीत राष्ट्रीय कीटक निरीक्षण प्रणालीचं उद्घाटन केले. या NPPS च्या माध्यमातून शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या कीटकनाशकांची माहिती मिळेल तसंच शेतकरी त्यांच्या हानिकारक

प्रभावापासून पिकं वाचवू शकतील. अशी माहिती चौहान यांनी यावेळी दिली. यावेळी त्यांनी केंद्र सरकारच्या विविध योजनांचे लाभार्थी असलेल्या शेतकऱ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाला सुमारे पाचशे शेतकरी उपस्थित होते.

**वाजपेयी**

माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांची आज पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त नवी दिल्लीतल्या 'सदैव अटल' या त्यांच्या समाधी स्थळाजवळ आज प्रार्थना सभेचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रपाती द्रौपदी मुरमू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह विविध केंद्रीय मंत्र्यांनी आज अटल बिहारी वाजपेयी यांच्या समाधी स्थळावर जाऊन आदरांजली अर्पण केली.

**निधन**

प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ राम नारायण अग्रवाल यांचं काल निधन झालं. संरक्षण संशोधन आणि विकास संघटना अर्थात DRDO ने डॉ अग्रवाल यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. पद्मश्री आणि पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित, असलेल्या डॉ अग्रवाल यांनी भारताच्या लांब पल्ल्याच्या अग्नी क्षेपणास्त्राच्या निर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. डॉ. अग्रवाल यांनी दोन दशकांहून अधिक काळ देशाच्या महत्त्वाकांक्षी अग्नी क्षेपणास्त्र कार्यक्रमाचं नेतृत्व केलं असल्याचं DRDO नं समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**पाऊस-इशारा**

भारतीय हवामान विभागानं दिल्ली, केरळ, ओडिशा, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडसह अनेक राज्यांमध्ये या आठवड्यात मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. दिल्ली आणि परिसरात येत्या 21 ऑगस्टपर्यंत मध्यम पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त केली आहे. याशिवाय केरळच्या काही भागात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला असून वायनाड आणि कोझिकोड या दोन जिल्ह्यांमध्ये अतिमुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज सांगितला आहे. तर केरळमधल्या उर्वरित बारा जिल्ह्यांमध्येसुद्धा जोरदार पाऊस पडण्याचा इशारा देण्यात आला आहे. आग्नेय अरबी समुद्र आणि दक्षिण केरळ किनारपट्टीवर चक्रीवादळ निर्माण झाल्यामुळं केरळ राज्यात आजपासून ते येत्या सोमवार पर्यंत मुसळधार पाऊस पडेल असंही हवामान विभागानं म्हटलं आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार